ePaper
शपथविधीसाठी उपराजधानी सज्ज! मंत्रिमंडळ विस्ताराकडे लक्ष
वर्ष - 8 । अंक -156 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 14 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- करोडपती झाला विश्विविजेता गुकेश
- माझा मुलगा डावखुरा फलंदाज
- संध्या थिएटरमध्ये चेंगराचेंगरी!
- राजाला वेषांतर करण्याचा शौक

## मंत्र्यांची संख्या, खात्यांवरून घोळ

# रखडलेला शपथविधी आज नागपूरमध्ये?

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मनधरणी सुरूच, भाजपमध्येही काही नावांवर आक्षेप

। मुंबई । महाईन्यूज

**खातेवाटप, मंत्र्यांची संख्या यावरून महायुतीमध्ये घोळ कायम राहिल्याने शनिवारी प्रस्तावित असलेला राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आता रविवारी नागपूरमध्ये होईल असे सांगितले जाते. मात्र त्याला अधिकृत दुजोरा देण्यातआलेला नाही. भाजप नेत्यांना अजूनही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मनधरणी करावी लागत असताना भाजपमध्येही काही नावांवर आक्षेप असल्याचे समजते. दरम्यान शिंदे यांनी शुक्रवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली.**



विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून दोन आठवडे तर मुख्यमंत्र्यांचा शपथविधी पार पडून आठवडा उलटला तरीही संपूर्ण सरकार आकारास आलेले नाही. सोमवारपासून नागपूरमध्ये सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथविधीनंतर पहिल्याच पत्रकार परिषदेत सूतोवाच केले होते. फडणवीस यांनी नवी दिल्लीत गृहमंत्री अमित शहा आणि पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याशी भाजपच्या मंत्र्यांचे नावे आणि मित्रपक्षांच्या खात्यांवर चर्चा केली होती. शनिवारी विस्तार होईल, अशी शक्यता वर्तविली जात होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तसे संकेत दिले होते. पण शुक्रवारी रात्रीपर्यंत विस्ताराबाबत काहीच निर्णय झाला नव्हता. विस्तार रविवारी दुपारी नागपूरमध्ये होईल, असे संकेत सरकारी सूत्रांकडून देण्यात आले.

महायुतीत मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटप यावर एकमत न होऊ शकल्याने विस्तार लांबणीवर पडल्याचे सांगण्यात येते. उपमुख्यमंत्री शिंदे यांचे अजूनही समाधान झालेले नाही. यामुळेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिंदे यांची भेट घेतली. फडणवीस यांनीही शिंदे यांच्याशी चर्चा केल्याचे सांगण्यात येते.

महायुतीत शिवसेनेला (शिंदे) १२ किंवा १३ मंत्रीपदे देण्याची भाजपने तयारी दर्शविली आहे. पण खातेवाटपाचा तिढा कायम होता. शिंदे यांना नगरविकासबरोबर महसूल खाते हवे आहे. महसूल सोडण्याची भाजपची तयारी नाही. याशिवाय शिंदे यांच्या काही माजी मंत्र्यांच्या फेरसमावेशास भाजपने आक्षेप घेतल्याने शिंदे यांनी नापसंती व्यक्त केली आहे.

### दोन्हीकडेही तयारी

शनिवारी विस्तार होण्याची शक्यता गृहीत धरून राजभवनवर सारी तयारी करण्यात आली आहे. मुख्यमंत्री कार्यालयाने शनिवारी विस्तार करण्याची सूचना केल्यास सारी तयारी झाल्याचे राजभवनातून सांगण्यात आले. सोमवारपासून नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन सुरू होत असल्याने अधिकारी, कर्मचाऱ्यांची नागपूरला जाण्याची लगबग सुरू झाली आहे. रविवारी चहापानाच्या पूर्वी दुपारी नागपूरमध्ये मंत्रिमंडळाचा विस्तार करण्याची योजना आहे. नागपूरमध्ये शपथविधीची तयारी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सरकार स्थापनेनंतर नवीन मंत्रिमंडळाचा विस्तार आतापर्यंत मुंबईतच होण्याची परंपरा आहे. प्रथमच नागपूरमध्ये नवीन सरकारचा विस्तार होत आहे. शिवसेनेतील फुटीनंतर १९९१ मध्ये छगन भुजबळ आणि राजेंद्र गोडे या दोघांचा नागपूरमध्ये शपथविधी झाला होता.

### महत्त्वाच्या विभागांचा आग्रह


- तिन्ही पक्षांना पायाभूत सुविधांशी संबंधित खाती हवी आहेत. गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम या भाजपकडे असलेल्या खात्यांवर राष्ट्रवादीचे लक्ष आहे.
- भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून अद्याप पक्षाच्या मंत्र्यांची नावे मुंबईत कळविण्यात आलेली नाहीत. यामुळे विस्तारास विलंब होत असल्याचे भाजपच्या सूत्राकडून सांगण्यात आले.
- भाजपमध्ये ज्येष्ठ नेत्यांच्या समावेशाबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. काही ज्येष्ठ नेत्यांना मंत्रिमंडळात संधी दिली जाणार नाही, असे संकेत प्राप्त होत आहेत.

## पुण्यात घरांच्या किमती वाढता वाढता वाढे!

### प्रतिचौरस फूट 5 हजार 30 रुपयांवरून 8 हजार 500 रुपयांवर पोहोचल्या

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

पुण्यातील गृहनिर्माण बाजारपेठेची वाढ करोना संकटानंतर मोठ्या प्रमाणात होत आहे. ग्राहकांकडून मोठ्या घरांना मागणी वाढल्याने विकसकांकडून अशा गृहप्रकल्पांना प्राधान्य दिले जात आहे. पुण्यात गेल्या सहा वर्षांत घरांच्या किमतीत वाघोली भागात सर्वाधिक ३७ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. याच वेळी गृहप्रकल्पांसाठी वाकड भागाला सर्वाधिक



पसंती असल्याचे समोर आले आहे. अनारॉक ग्रुपने देशातील मालमत्ता क्षेत्राचा अहवाल जाहीर केला आहे. यात पुणे, मुंबईसह दिल्ली, कोलकता, बंगळुरू, हैदराबाद आणि चेन्नई या महानगरांचा समावेश आहे. गेल्या सहा वर्षांत म्हणजेच २०१९ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत घरांच्या किमतीत झालेल्या वाढीचा आढावा यातून घेण्यात आला आहे. या अहवालानुसार, देशात घरांच्या किमतीत सर्वाधिक ६९ टक्के वाढ बंगळुरूतील गुंजूर भागात झाली आहे. गेल्या सहा वर्षांत येथे घरांच्या सरासरी किमती प्रतिचौरस फूट ५ हजार ३० रुपयांवरून ८ हजार ५०० रुपयांवर पोहोचल्या आहेत. पुण्याचा विचार करता वाघोली परिसरात घरांच्या किमतीत सर्वाधिक ३७ टक्के वाढ झाली आहे. वाघोली परिसरात माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांची कार्यालये मोठ्या प्रमाणात सुरू होत आहेत. त्यामुळे गेल्या सहा वर्षांत वाघोलीमध्ये घरांच्या सरासरी किमती प्रतिचौरस फूट ४ हजार ८२० रुपयांवरून ६ हजार ६०० रुपयांवर गेल्या आहेत. याच वेळी पुण्यात गृहप्रकल्पांसाठी सर्वाधिक पसंती वाकड भागाला आहे. गेल्या सहा वर्षांत वाकडमध्ये घरांच्या सरासरी किमतीत २७ टक्के वाढ झाली आहे.

### मुंबईत पनवेलमध्ये सर्वाधिक वाढ

मुंबई महानगर क्षेत्रात पनवेलमध्ये गेल्या सहा वर्षांत घरांच्या किमतीत सर्वाधिक ५८ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. गेल्या सहा वर्षांत पनवेलमध्ये घरांच्या किमती प्रतिचौरस फूट ५ हजार ५२० रुपयांवरून ८ हजार ७०० रुपयांवर गेल्या आहेत. मुंबईत वरळीला सर्वाधिक पसंती आहे. गेल्या सहा वर्षांत वरळीत घरांच्या सरासरी किमतीत ३७ टक्के वाढ झाली आहे.

# शाळेत प्रवेश घेताय? चौकशी करा!

## फसवणुकीपासून सावध राहण्याचे 'झेडपी'च्या शिक्षणाधिकाऱ्यांचे पुणेकरांना आवाहन

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**येता जाता रस्त्यांच्या बाजूला नर्सरी, पहिली, दुसरी अथवा पाचवीपर्यंतच्या प्रवेशाच्या जाहिराती पाहायला मिळतात. त्या जाहिरातीच्या अनुषंगाने तुम्ही त्या शाळांमध्ये आपल्या पाल्याला नर्सरी, किंवा पहिलीला प्रवेश घेताय? तर सावधान! आपल्या मुलांना नर्सरी, पहिली किंवा कोणत्याही इयत्तेसाठी प्रवेश घेण्यापूर्वी शाळांची चौकशी करूनच प्रवेश घ्या; अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते.**




या संदर्भात जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, कँटोन्मेंट बोर्डासह महानगरपालिका, जिल्ह्यातील नगरपालिकांच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात खासगी शाळा सुरू झाल्या आहेत. या शाळांमधून 'आयसीएसई', 'सीबीएसई' आणि 'आयबी'; तसेच राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांत सध्या प्रवेशाचे सत्र सुरू झाले आहे. बहुतांश अनेक शाळांतून नव्या शैक्षणिक वर्षांच्या प्रवेशासाठी जाहिरातबाजी सुरू आहे. त्या संदर्भात रस्त्यांच्या कडेला अथवा मोठमोठ्या संस्थांच्या बाहेर जाहिरातींचे फ्लेक्स लावण्यात आले आहेत. त्या फ्लेक्सवर आकर्षक जाहिराती करून पालकांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे. त्या फ्लेक्सच्या जाहिरातीमुळे पालकांची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने पालकांची फसवणूक होऊ नये, यासाठी १६ ते १८ डिसेंबरदरम्यान, www.zppune.org या वेबसाइटवर शाळांची यादी प्रसिद्ध केली जाईल. अनधिकृत शाळेत प्रवेश होणार नाही, याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पुणे जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात एकही अनधिकृत शाळा सुरू राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून सर्वेक्षण करून अनधिकृत शाळांचा शोध घेण्यात येणार आहे, असेही शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.या संदर्भात जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, कँटोन्मेंट बोर्डासह महानगरपालिका, जिल्ह्यातील नगरपालिकांच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात खासगी शाळा सुरू झाल्या आहेत. या शाळांमधून 'आयसीएसई', 'सीबीएसई' आणि 'आयबी'; तसेच राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांत सध्या प्रवेशाचे सत्र सुरू झाले आहे. बहुतांश अनेक शाळांतून नव्या शैक्षणिक वर्षांच्या प्रवेशासाठी जाहिरातबाजी सुरू आहे. त्या संदर्भात रस्त्यांच्या कडेला अथवा मोठमोठ्या संस्थांच्या बाहेर जाहिरातींचे फ्लेक्स लावण्यात आले आहेत. त्या फ्लेक्सवर आकर्षक जाहिराती करून पालकांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

### प्रवेश घेण्यापूर्वी काय काळजी घ्याल?

- शाळेत प्रवेश घेताना शाळेला सरकारची मान्यता आहे का, याची तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी; तसेच महानगरपालिका, नगरपालिका पातळीवर प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे खातरजमा करावी.
- शाळेला 'यू डायस नंबर' आहे का?
- प्रथम मान्यता, शाळेचे खेळाचे मैदान, स्वच्छतागृहे आहेत का?
- शाळांमध्ये भौतिक सुविधा आहेत का?
- शाळांमध्ये सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविलेले आहेत का?
- पालक-शिक्षक समिती स्थापन केली आहे का?
- विद्यार्थ्यांच्या वाहन व्यवस्थेत महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे का? शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी केली आहे का?

# शहरात दिवसभरात आगीच्या चार घटना

## सोफा निर्मिती करणाऱ्या कारखान्यात आग लागून कामगाराचा मृत्यू

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील कोंढवा, येरवडा आणि शिवाजीनगर भागात शुक्रवारी दुपारी चार ठिकाणी आग लागल्याची घटना घडली. कोंढवा परिसरातील येवलेवाडीत सोफा निर्मिती करणाऱ्या कारखान्यात आग लागल्याने गंभीर भाजलेल्या एकाचा मृत्यू झाला. कोंढव्यातील येवलेवाडी भागात सोफा निर्मिती करणारा कारखाना आहे.**



शुक्रवारी दुपारी दीडच्या सुमारास कारखान्यात आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. कारखान्यात ठेवलेल्या एका छोट्या सिलिंडरचा स्फोट झाला होता. कारखान्यात वेल्डिंगचे काम करण्याचे काम सुरु असल्याचे या भागातील रहिवाशांनी सांगितले. जवानांनी पाण्याचा मारा करुन तासाभरात आग आटोक्यात आणली. आगीत कारखान्यातील कामगार हरुण अहमद खान (वय ४५) हे गंभीर होररळले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली.दुसऱ्या एका घटनेत कोंढव्यातील मीठानगर परिसराात एका इमारतीच्या आवारात असलेल्या रोहित्राने पेट घेतल्याची घटना दुपारी अडीचच्या सुमारास घडली. जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळविले. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी नाही. दुपारी तीनच्या सुमारास शिवाजीनगर परिसरातील संचेती रुग्णालयाजवळ बंद असलेल्या एका जून्या लाकडी घराला आग लागल्याची घटना घडली. आगीमागचे नेमके कारण समजू शकले नाही. येरवड्यातील लक्ष्मीनगर परिसरात दाट लोकवस्ती असलेल्या एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील घरात आग लागली. या घटनेची माहिती मिळताच येरवडा आणि धानोरी अग्निशमन केंद्रातील जवानांनी घटनास्थळी धाव घेतली.

### तासाभरात आग आटोक्यात

जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.शुक्रवारी दुपारी दीडच्या सुमारास कारखान्यात आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. कारखान्यात ठेवलेल्या एका छोट्या सिलिंडरचा स्फोट झाला होता. कारखान्यात वेल्डिंगचे काम करण्याचे काम सुरु असल्याचे या भागातील रहिवाशांनी सांगितले.जवानांनी पाण्याचा मारा करुन तासाभरात आग आटोक्यात आणली. आगीत कारखान्यातील कामगार हरुण अहमद खान (वय ४५) हे गंभीर होररळले.

### संरक्षण रक्षण विभागाच्या हद्दीतील रखडलेल्या

# पालखी मार्गाला गती मिळणार!

## खासदार श्रीरंग बारणे यांचा लोकसभेत तारांकित प्रश्न

### संरक्षण व सार्वजनिक बांधकाम विभागासोबत लवकरच बैठक; नितीन गडकरी यांची ग्वाही

। पिंपरी । महाईन्यूज

**तीर्थक्षेत्र देहूगाव ते देहूरोडपर्यंतचा साडेतीन किलोमीटर अंतराचा संरक्षण विभागाच्या हद्दीतील श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गाचे रुंदीकरण रखडले आहे. त्यामुळे वारकऱ्यांना पायी चालताना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी तत्काळ संरक्षण विभागाकडून जागा ताब्यात घेऊन रखडलेल्या मार्गाचे काम सुरू करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत तारांकित प्रश्नाद्वारे केली. त्यावर याबाबत संरक्षण विभाग आणि राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागासोबत लवकरच एकत्रित बैठक घेण्याची ग्वाही केंद्रीय रस्ते विकास व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. त्यामुळे रखडलेल्या मार्गाला गती मिळेल असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.**



श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील पहिले साडेतीन किलोमीटर म्हणजे देहूगाव ते देहूरोड हे अंतर रुंदीकरण करणे फार महत्त्वाचे आहे. लष्कराच्या ताब्यात ही जमीन आहे, त्यामुळे येथे अडचणी आहेत. हा सुरुवातीचा टप्पा अतिशय कठीण आहे. तुकारामांची पालखी निघताना गाव लोटलेला असतो. यावेळेस या पालखी मार्गावरून बससेवा, वाहतूक आदी बंद ठेवावी लागते. त्याचा स्थानिक नागरिकांना खूप मोठा फटका बसतो. त्यामुळे देहूगाव ते देहूरोड हे अंतर रुंदीकरण करण्याची वारकऱ्यांची मागणी आहे.

याबाबत खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत तारांकित प्रश्नाद्वारे आवाज उठविला. ते म्हणाले, देहूगाव ते देहूरोड या साडेतीन किलोमीटर अंतराचा पालखी मार्ग संरक्षण विभागाच्या हद्दीतून जातो. या जागेचा ताबा राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. या जागेतील मार्गाचे रुंदीकरण रखडले आहे. यामुळे वारकऱ्यांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. हा रस्ता पंढरपूर वारीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या रस्त्यावर होणारी वाहतूक आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय अत्यंत गरजेचा आहे. रस्त्याच्या देखभालीसाठी तसेच वारीच्या पवित्र सोहळ्याच्या सोईसाठी रखडलेला मार्गाचे रुंदीकरण करणे भविष्यातील विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हा मार्ग कधीपर्यंत पूर्ण होईल. संरक्षण विभागासोबत जागेसंदर्भात काय कारवाई केली जाईल असा प्रश्न खासदार बारणे यांनी केला. त्यावर उत्तर देताना मंत्री नितीन गडकरी म्हणाले, रखडलेल्या पालखी मार्गाच्या रुंदीकरणाचे काम करण्यासाठी संरक्षण विभागाची परवानगी घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याबाबत लवकरात लवकर संरक्षण विभागासोबत बैठक घेतली जाईल. राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाशीही चर्चा केली जाईल. त्यात मार्ग काढून काम पूर्ण केले जाईल.

### नितीन गडकरी यांचे अभिनंदन

देहूतून पंढरपूरपर्यंत पालखी मार्ग जात आहे. त्यामुळे वारकऱ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. वारकऱ्यांची गैरसोय दूर झाली आहे. पालखी मार्ग केल्याबद्द खासदार बारणे यांनी नितीन गडकरी यांचे लोकसभेत अभिनंदन केले.

> देहूगाव ते देहूरोडपर्यंत पालखी मार्गाच्या रखडलेल्या रुंदीकरणाबाबत लवकरच संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांशी बैठक घेण्याची ग्वाही मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. त्यामुळे जागेचा प्रश्न सुटून लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल, असा विश्वास आहे.
>
> –श्रीरंग बारणे, खासदार मावळ लोकसभा

# मादी बिबटची नसबंदी होणार !

## वन विभागाकडून प्रयत्न सुरू : केंद्राकडे पाठवला प्रस्ताव

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जुन्नर परिसरामध्ये बिबट्यांनी धुमाकूळ घातला असून, मादी बिबटची नसबंदी करावी, अशी अनेक दिवसांपासूनची मागणी होती. त्या मागणीला अनुसरून वन विभागाने केंद्र सरकारकडे मादीच्या नसबंदीसाठी प्रस्ताव पाठवला आहे. त्यावर सकारात्मक विचार होणार असल्याने लवकरच मादी बिबटची नसबंदी होऊ शकणार आहे.**



जुन्नर उपवन विभाग क्षेत्रात बिबट प्रजनन नियंत्रण करण्यासाठी सातत्याने वन विभाग प्रयत्न करत आहे. त्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात असून, आता मादी व नर बिबटची नसबंदी करण्याचा उपाय करण्यात येणार आहे. त्यासाठी काही दिवसांपूर्वी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीदेखील मागणी केली होती. संसदेमध्येही त्यांनी हा विषय मांडला होता. राज्याच्या वन्यजीव विभागाने ११ नर आणि ३६ मादी बिबट्यांवर गर्भनिरोधक उपाययोजना करण्यासाठीचा प्रस्ताव केंद्रीय वन विभागाच्या अतिरिक्त महासंचालकांकडे सादर करण्यात आला आहे.

जुन्नर उपवन विभाग क्षेत्रातील जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यात बिबट्यांकडून दररोज हल्ले होत आहेत. त्यामुळे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. गेल्या काही वर्षांत बिबट्यांच्या हल्ल्याचे प्रमाण वाढत आहे.

वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक पातळीवर ११ नर आणि ३६ मादी बिबट्यांवर गर्भनिरोधक उपाययोजना करण्याचा प्रस्ताव केंद्रीय वन विभागाच्या अतिरिक्त महासंचालकांकडे मान्यतेसाठी सादर केला आहे. या प्रस्तावात वन्यजीव संस्थेच्या सहकार्याने नर आणि मादी बिबट्यांच्या ग्रंथींचा अभ्यास व गर्भनिरोधन यावर भर देण्यात येणार आहे.

> त्याचबरोबर बिबटप्रवण क्षेत्रातील बिबट्यांच्या हालचाली, खाद्य या बाबींचाही अभ्यास केला जाणार आहे. त्यामुळे जर या प्रस्तावाला मंजुरी मिळाली तर बिबट्यांच्या संख्येवर नियंत्रण मिळण्यासाठी मदत होणार आहे. बिबट नसबंदी करण्यासाठी आम्ही प्रस्ताव पाठवला आहे. त्यासाठी देहराडून येथील वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या संस्थेनेदेखील शिफारस केली आहे. त्यामुळे सरकारकडून याविषयी लवकर निर्णय होऊ शकेल. त्यामुळे बिबट संख्येच्या नियंत्रणासाठी मदत होईल
>
> -अमोल सातपुते, उपवनसंरक्षक, जुन्नर वन विभाग




# सरकारी संसारात 'नांदा सौख्यभरे'

**आता सरकार स्थापन झाले, म्हणजे संसार सुरू झाला म्हणून नांदा सौख्यभरे म्हणायचे. कोण कुठून कुठून आले, त्यात रुसवे फुगवे झाले, कुणी कुणाला काय (अहेर) दिले, घेतले याचे व्यावहारिक हिशेब झाले. ते पुढेही होत राहतील.**

घरच्यांना सांभाळायचे, बाहेरून आलेल्याचा पाहुणचार करायचा, प्रत्येकाला हवे नको ते बघायचे म्हणजे यजमानांसाठी तारेवरची कसरत. पत्रिका जुळल्या म्हणून स्वभाव जुळतील याची खात्री नसते. सरकारच्या संसारातही तडजोडी कराव्याच लागतात. कुणाचे घराणे मोठे, कुणाचा अनुभव दांडगा, कुणाचे आर्थिक पाठबळ मोठे, शिवाय जाती धर्मांची समीकरणे वेगळी... हे सारे तोलून मापून पुढे जायचे म्हणजे तारेवरची कसरत. पण ती करताना फक्त आपापला विचार करू नका. ज्यांनी तुमचे हे लग्न जमवून आणले त्या वरातीतल्या वऱ्हाडी मंडळींचा विचार करा. त्यांनीच तुम्हाला सत्तेच्या बोहल्यावर बसवले हे विसरू नका. मधुचंद्र फक्त चार आठ दिवसांचा असतो. नंतरचा संसार, त्यातले जमाखर्च, उत्पन्न, विकास हा जास्त मोलाचा असतो. फक्त स्वार्थाचा, स्वतःच्या तिजोऱ्या भरण्याचा विचार न करता, जनतेचा विचार करा. अवतीभवती कुणाला काय हवे नको ते बघा. फुकटच्या खिरापती वाटून सरकारी



तिजोऱ्या रिकाम्या करू नका. इथे प्रत्येकाला स्वाभिमान आहे. आत्म सन्मान आहे. कुणालाही भीक नको आहे. त्यांना उत्तम शिक्षण द्या, त्यांचे आरोग्य चांगले राहील यासाठी उत्तम दवाखाने बांधा. फक्त संख्यावाढ कामाची नाही. गुणवत्ता महत्त्वाची असते. दर्जा सांभाळायचा असतो. एरवी शाळा, कॉलेजेस, विद्यापीठे, आयआयटी यांची संख्या गेल्या काही वर्षात भूमिती श्रेणीने वाढली. पण दर्जा त्या प्रमाणात नाही राखला गेला. अनेक शाळा कॉलेजात, विद्यापीठात हव्या त्या प्रमाणात शिक्षक प्राध्यापक नाहीत. अनेक सरकारी पदे वर्षानुवर्षे भरली गेली नाहीत. कंत्राटी कारभार सुरू आहे. त्यात गांभीर्य नसते. जबाबदारी नसते. आपलेपणा नसतो. प्रत्येकाला हाताला काम हवे आहे. त्यासाठी योग्य कौशल्य शिक्षण हवे आहे. योग्य मार्गदर्शन हवे आहे. आजची तरुणाई भरकटलेली आहे. दिशाहीन झाली आहे. त्यांना नीट समुपदेशनाची गरज आहे. चांगले काय, वाईट काय हा विवेक जागृत करण्याची गरज आहे. एरवी नवे शैक्षणिक धोरण, किंवा तत्सम चांगल्या योजना फक्त दप्तरी पडून राहायला नकोत. योजना उत्तम असतात. त्यामागचा विचार, उद्दिष्ट हेही चांगले असते. पण ते जिथे झिरपायचे तिथे खोलवर रुजले पाहिजे. इकडे तिकडे वाया जायला नको. अजूनही शेतकरी नाराज का आहेत? त्यांच्या नेमक्या समस्या, गरजा काय आहेत, याचा सहानुभूतीने विचार करायला हवा. त्यांच्या खऱ्या समस्या सहानुभूतीने ऐकून घ्यायला हव्यात. त्यांच्या शेतमालाला उचित भाव मिळाला, चांगली बाजारपेठ मिळाली, वेळेवर वीज पाण्याची सोय झाली तर त्यांनाही कर्जमाफीची गरज भासणार नाही. तिथंही व्यसनाच्या आहारी गेलेल्या कुटुंबीयांना समुपदेशनाची, उपचाराची गरज आहे. शरीराचे आरोग्य जितके महत्वाचे तितकेच मानसिक आरोग्य देखील महत्वाचे. तेही सरकारचेच आद्य कर्तव्य आहे. एरवी तुमचे धोरण म्हणजे जखम एकीकडे अन् मलम दुसरीकडे असे असते. या योजनांची, धोरणांची अंमलबजावणी करणारे तुमच्या अवतीभवतीचे अधिकारी चांगले शिकले सवरलेले असतात. त्यांच्या प्रशिक्षणासाठी सरकार करोडो रुपये खर्च करीत असते. त्यांच्या बुध्दिकौशल्याचा नीट उपयोग करून घ्या. त्यांना जबाबदारी द्या, अन् त्या बरोबर निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यही द्या. सगळ्या किल्ल्या स्वतःच्या हातात ठेवण्यात धोरणी शहाणपण निश्चितच नाही. सर्वांना त्यांचे काम वाटून द्या. प्रत्येकाचे लक्ष्य ठरवून द्या. अन् त्या लक्ष्यपूर्तीसाठी त्यांना जबाबदार धरा. सत्तेचे, अधिकाराचे विकेंद्रीकरण फार गरजेचे आहे.

प्रत्येक समस्येला उत्तर असतेच. विज्ञान तंत्रज्ञानाचा विचार केला तर एकापेक्षा जास्त उत्तरे असतात. ती शोधली की सापडतात. पण तुम्हाला प्रश्न चिघळत ठेवायचे असतात. कारण सगळे प्रश्न सुटले, सोडवले तर तुमच्याकडे कोण येईल, तुमचे महत्व ते काय राहील ही भीती वाटते तुम्हाला. हा भयगंड सोडून द्या.

## प्रासंगिक »

### ऑप्टिमिस्ट

***भारतासारख्या अर्धविकसित देशात जेथे विकास ही संकल्पना जात वा धर्माच्या नजरेतून पाहिली जाण्याचा धोका असतो, तेथे पर्यावरणवादी असणे सोपे नाही.***

माधव गाडगीळ यांच्यासारख्या 'तापहीन मार्तंड' व्यक्तीची महती सद्या:स्थितीत एका वाक्यात विशद करता येईल. "अर्बन नक्षल न ठरवला गेलेला पर्यावरणवादी" या एका विधानात गाडगीळ यांच्या कार्याचे तसेच व्यक्तिमत्त्वाचे महत्त्व अधोरेखित होते. भारतासारख्या अर्धविकसित देशात जेथे विकास ही संकल्पनादेखील जात वा धर्माच्या किंवा उजवे की डावे या नजरेतून पाहिली जाण्याचा धोका असतो, त्या देशात पर्यावरणवादी असणे सोपे नाही. गाडगीळ यांचे दुर्मीळ वैशिष्ट्य असे की त्यांना 'उजवे'ही मानतात आणि 'डाव्यां'च्या प्रकाशनांतूनही त्यांचे लिखाण नियमितपणे प्रसिद्ध होत असते. असे दोन्ही बाजूस आदरणीय असणे कमालीचे अवघड. तथापि या उभय-पंथी आदरास पात्र ठरावे म्हणून कोणत्याही युक्त्या, बोटचेपेपणा गाडगीळ यांनी कधी केला नाही.

जागतिक आरोग्य संघटनेच्या व्याख्येनुसार मानसिक आरोग्यामध्ये भावनिक, मनोवैज्ञानिक आणि सामाजिक कल्याण यांचा समावेश होतो, ज्याचा आकलनशक्ती, धारणा आणि वर्तन यांवर परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटने (डब्ल्यूएचओ) च्या मते, ही एक 'कल्याणाची स्थिती आहे ज्यामध्ये व्यक्तीला तिच्या क्षमतांची जाणीव होते.

# भारतातील आरोग्यांचे धोरण आणि कायदे

ती तिच्या जीवनातील सामान्य ताणतणावांचा सामना करू शकते. उत्पादक आणि फलदायीपणे कार्य करू शकते आणि तिचा समुदाय, तसेच व्यक्तिगत पातळीवर एखादी व्यक्ती तणाव, परस्पर संबंध आणि निर्णय घेण्याची क्षमता कशी हाताळते हे देखील ते ठरवते. भारतामध्ये मानसिक आरोग्य धोरण आणि कायद्याचा प्रवास हा टप्प्याटप्प्याने प्रगती करत आलेला आहे. या प्रवासाची सुरुवात १९ व्या शतकात झाली, जेव्हा ब्रिटीश कालखंडात काही मानसिक आरोग्य संस्थांची स्थापना झाली. १८९७ साली लागू झालेला इंडियन लुनासी अॅक्ट हा कायदा मानसिक रुग्णांसाठी प्रथमच व्यवस्थात्मक दृष्टीकोन मांडणारा कायदा होता. मात्र, हा कायदा आजच्या दृष्टिकोनातून मागासलेला आणि अपुरा वाटतो. मात्र, त्या काळातील मानसिक आरोग्य व्यवस्थापन हे रुग्णांना वेगळे ठेवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करत होते. हा कायदा रुग्णांना 'लूनाटिक' म्हणजेच वेडसर म्हणून वर्गीकृत करत



असे. यामध्ये रुग्णांच्या कल्याणापेक्षा नियंत्रणाला प्राधान्य होते. या कायद्याचा उद्देश हा मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींना ओळखणे आणि त्यांना वेगळे ठेवण्यासाठी नियामक व्यवस्था तयार करणे हा होता. तसेच मानसिक रुग्णांसाठी आश्रयगृहांची (ASYLUMS) स्थापना करणे आणि त्यांचे प्रशासन ठरवणे आणि मानसिक आजारग्रस्त व्यक्तींवर नियंत्रण ठेवणे आणि त्यांना समाजापासून विलग करणे हा होता. या कायद्याचा परिणाम असा झाला की मानसिक आरोग्यासाठी मूलभूत वैधानिक चौकट उपलब्ध झाली, परंतु ती मुख्यतः संस्थात्मक नियंत्रणावर आधारित होती. मानसिक आरोग्यासंबंधी कलंक आणि नकारात्मकता वाढीस लागली. तसेच उपचारांची मर्यादा, पायाभूत सुविधा, आणि रुग्णांचे अधिकार याकडे दुर्लक्ष झाले. भारतातील मानसिक आरोग्य क्षेत्राच्या ऐतिहासिक प्रवासाचा हा कायदा एक महत्त्वाचा टप्पा मानला जाऊ शकतो, जो मानसिक आरोग्याच्या सध्याच्या प्रगत धोरणांसाठी शिकवण ठरला आहे. १८९७ चा इंडियन लुनासी अॅक्ट हा काळाच्या संदर्भात मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी पहिला टप्पा ठरला असला, तरी तो उपचारांपेक्षा विलगीकरणावर आधारित होता. हा कायदा मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी योग्य दिशादर्शक ठरला नाही. यावर आधारित अनुभव आणि चुका लक्षात घेऊन पुढे १९८७ आणि २०१७ चे कायदे अधिक सुस्पष्ट आणि मानवतावादी दृष्टिकोनात तयार करण्यात आले. १९८७ चा मानसिक आरोग्य कायदा : १९८७ चा मेंटल हेल्थ अॅक्ट हा भारतात मानसिक आरोग्यासाठी लागू केलेला पहिला व्यापक कायदा होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# हनुमान मंदिरावरुन राजकारण!

## »सोमय्या यांनी रेल्वे प्रशासनाला लिहिलं पत्र

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईतल्या दादरमधील ८० वर्षे जुनं मंदिर पाडण्यासाठी रेल्वेने नोटीस बजावल्याची माहिती उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषदेत दिली. तसंच त्यांनी भाजपाला हिंदुत्वाचा विसर पडला आहे का? असा सवाल केला. यावरुन उद्धव ठाकरेंवर टीका होते आहे. नवनीत राणांनी उद्धव ठाकरेंचा उल्लेख जनाब असा करत त्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये म्हटलं आहे. तर किरीट सोमय्यांनीरेल्वे प्रशासनाला एक पत्र लिहिलं आहे.**



बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत आहेत. इस्कॉनचं मंदिर जाळण्यात आलं. त्यांच्या प्रमुखांना अटक झाली तरीही गप्प आहोत. हिंदूंवर अत्याचार होऊनही गप्प आहोत. माझी तमाम हिंदूंतर्फे पंतप्रधान मोदींना विनंती आहे की जसं आपण एका फोनवर युक्रेनचं युद्ध थांबवलं होतं तसंच बांगलादेशात जे काही हिंदूंवर अत्याचार होत आहेत त्याबद्दल भूमिका घ्यायला पाहिजे. नुसतं इथे बटेंगे, कटेंगे, फटेंगे वगैरे करुन उपयोग नाही. जिथे काही नाही तिथे छाती फुगवून दाखवू नका. जिथे अत्याचार होत आहेत त्यांना धमक दाखवण्याची गरज आहे असंही उद्धव ठाकरे म्हणाले होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजवटीत हनुमानाचं मंदिर पाडलं जाण्याची नोटीस येते आहे. सिडकोतल्या मंदिरावर कुणाचा तरी डोळा आहे. हल्ली कुणाला सगळं मिळतं तुम्हाला माहित आहेच. बांगलादेशात मंदिर जाळलं जातं आहे. हिंदूंवर बांगलादेशात अत्याचार होत आहेत तरीही जे हिंदुत्व हिंदुत्व करतात त्या भाजपाची हिंदुत्वाची व्याख्या आणि आकारऊकार तरी काय? हे मला उत्तर मिळालं पाहिजे. निवडणुकीपुरतं फक्त हिंदुत्व भाजपाकडे उरलं आहे का? हिंदू म्हणजे फक्त मतं नाहीत. त्यांना भावना आहेत. आधी हिंदूंना घाबरवायचं आणि मग त्यांची मंदिरंही सेफ नाहीत असं जर असेल तर काय बोलायचं असंही उद्धव ठाकरे म्हणाले होते.उद्धव ठाकरे यांनी याबाबत भाष्य केल्यानंतर आता भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी आपली भूमिका मांडली आहे. विशेष म्हणजे सोमय्या यांनी रेल्वे विभागाला तसं पत्र देखील पाठवलं आहे. तसेच "दादरला हनुमान मंदिर पाडण्याच्या नोटीसीचे पुनरावलोकन करण्याचे आश्वासन रेल्वे अधिकाऱ्यांनी मला दिले आहे. आम्ही ते मागे घेतील असे पाहू. अनेक दशके जुने हनुमान मंदिर पाडता येणार नाही", असं किरीट सोमय्या म्हणाले आहेत. सात दिवसांत हनुमान मंदिर पाडण्यासंबंधीच्या केलेल्या सूचना धक्कादायक आहेत. त्या भागात कुठलाही मोठा प्रकल्प येत नाहीये मग मंदिर पाडण्यासाठी ही नोटीस का? याचा विचार केला जावा असं किरीट सोमय्यांनीम्हटलं आहे. उद्धव ठाकरेंनी मोदींवर निशाणा साधल्यानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनीही उद्धव ठाकरेंची लायकी काढली. ज्यांनी सत्तेसाठी हिंदुत्वाची कास सोडली आणि काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसले ते उद्धव ठाकरे आज हिंदूंच्या रक्षणाबद्दल बोलत आहेत. उद्धव ठाकरे तुमचं हिंदू प्रेम किती बेगडी होतं हे तुमच्या अडीच वर्षांच्या सत्तेच्या काळात जनतेनं बघितलं. पालघरमध्ये झालेलं साधूंचं हत्याकांड आणि तुमची हिंदूविरोधी भूमिका महाराष्ट्रानं बघितली. अशी टीका बावनकुळेंनी केली आहे. बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत आहेत. इस्कॉनचं मंदिर जाळण्यात आलं. त्यांच्या प्रमुखांना अटक झाली तरीही गप्प आहोत. हिंदूंवर अत्याचार होऊनही गप्प आहोत. माझी तमाम हिंदूंतर्फे पंतप्रधान मोदींना विनंती आहे की जसं आपण एका फोनवर युक्रेनचं युद्ध थांबवलं होतं तसंच बांगलादेशात जे काही हिंदूंवर अत्याचार होत आहेत त्याबद्दल भूमिका घ्यायला पाहिजे. नुसतं इथे बटेंगे, कटेंगे, फटेंगे वगैरे करुन उपयोग नाही. जिथे काही नाही तिथे छाती फुगवून दाखवू नका. जिथे अत्याचार होत आहेत त्यांना धमक दाखवण्याची गरज आहे असंही उद्धव ठाकरे म्हणाले होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजवटीत हनुमानाचं मंदिर पाडलं जाण्याची नोटीस येते आहे. सिडकोतल्या मंदिरावर कुणाचा तरी डोळा आहे. हल्ली कुणाला सगळं मिळतं तुम्हाला माहित आहेच. बांगलादेशात मंदिर जाळलं जातं आहे. हिंदूंवर बांगलादेशात अत्याचार होत आहेत तरीही जे हिंदुत्व हिंदुत्व करतात त्या भाजपाची हिंदुत्वाची व्याख्या आणि आकारऊकार तरी काय?

### मंदिर पाडता येणार नाही

निवडणुकीपुरतं फक्त हिंदुत्व भाजपाकडे उरलं आहे का? हिंदू म्हणजे फक्त मतं नाहीत. त्यांना भावना आहेत. आधी हिंदूंना घाबरवायचं आणि मग त्यांची मंदिरंही सेफ नाहीत असं जर असेल तर काय बोलायचं असंही उद्धव ठाकरे म्हणाले होते.उद्धव ठाकरे यांनी याबाबत भाष्य केल्यानंतर आता भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी आपली भूमिका मांडली आहे. विशेष म्हणजे सोमय्या यांनी रेल्वे विभागाला तसं पत्र देखील पाठवलं आहे. तसेच "दादरला हनुमान मंदिर पाडण्याच्या नोटीसीचे पुनरावलोकन करण्याचे आश्वासन रेल्वे अधिकाऱ्यांनी मला दिले आहे. आम्ही ते मागे घेतील असे पाहू. अनेक दशके जुने हनुमान मंदिर पाडता येणार नाही", असं किरीट सोमय्या म्हणाले आहेत.

# जनाब उद्धव ठाकरे तुमची लायकी नाही

## »राणांची हनुमान चालीसा आंदोलनाची आठवण करून देत जोरदार टीका

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेशातील हिंदूंचं रक्षण पंतप्रधान नरेंद्र मोदी का करु शकत नाहीत? असा सवालल आज माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी विचारला होता. उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी भाजपावर, नरेंद्र मोदींवर आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर हिंदुत्वाच्या मुद्द्यावरुन टीका केली. त्यावर आता भाजपाच्या नेत्या नवनीत राणा यांनी जोरदार टीका केली आहे.**

जनाब उद्धव ठाकरे असा उल्लेख त्यांनी केला आणि त्यांनी उद्धव ठाकरेंना हनुमान चालीसा आंदोलनाची आठवणही करुन दिली.बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत आहेत. इस्कॉनचं मंदिर जाळण्यात आलं. त्यांच्या प्रमुखांना अटक झाली तरीही गप्प आहोत. हिंदूंवर अत्याचार होऊनही गप्प आहोत. माझी तमाम हिंदूंतर्फे पंतप्रधान मोदींना विनंती आहे की जसं आपण एका फोनवर युक्रेनचं युद्ध थांबवलं होतं तसंच बांगलादेशात जे काही हिंदूंवर अत्याचार होत आहेत त्याबद्दल भूमिका घ्यायला पाहिजे. नुसतं इथे बटेंगे, कटेंगे, फटेंगे वगैरे करुन उपयोग नाही. जिथे काही नाही तिथे छाती फुगवून दाखवू



नका. जिथे अत्याचार होत आहेत त्यांना धमक दाखवण्याची गरज आहे असंही उद्धव ठाकरे म्हणाले होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजवटीत हनुमानाचं मंदिर पाडलं जाण्याची नोटीस येते आहे. सिडकोतल्या मंदिरावर कुणाचा तरी डोळा आहे. हल्ली कुणाला सगळं मिळतं तुम्हाला माहित आहेच. बांगलादेशात मंदिर जाळलं जातं आहे. हिंदूंवर बांगलादेशात अत्याचार होत आहेत तरीही जे हिंदुत्व हिंदुत्व करतात त्या भाजपाची हिंदुत्वाची व्याख्या आणि आकारऊकार तरी काय? हे मला उत्तर मिळालं पाहिजे. निवडणुकीपुरतं फक्त हिंदुत्व भाजपाकडे उरलं आहे का? आधी हिंदूंना घाबरवायचं आणि मग त्यांची मंदिरंही सेफ नाहीत असं जर असेल तर काय बोलायचं असंही उद्धव ठाकरे म्हणाले होते.

### नवनीत राणा काय म्हणाल्या?

नवनीत राणा म्हणाल्या की, "जनाब उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते, तेव्हा मी हनुमान चालीसा पठण करणार म्हणून मला १४ दिवस जेलमध्ये ठेवण्यात आलं होतं. माझ्यावर आणि रवी राणांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तेव्हा उद्धव ठाकरे यांचे हिंदुत्व कुठे गेलं होतं? आज ते देशाच्या पंतप्रधानांवर बोलत आहेत. जनाब उद्धव ठाकरे तुमची लायकी नाही, देशाच्या पंतप्रधानांवर बोलायची" असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली.नवनीत राणा ( NAVNEET RANA ) पुढे म्हणाल्या की, "बांगलादेशवर जे अत्याचार होत आहे. यावर संपूर्ण महाराष्ट्रात हिंदू समाजाने मोर्चे काढले, निषेध व्यक्त केला. तेव्हा जनाब उद्धव ठाकरे कुठे होते?

# संध्या थिएटरमध्ये चेंगराचेंगरी!

## 35 वर्षीय महिलेचा मृत्यू; अल्लू अर्जूनवर गुन्हा दाखल; घरातून अटक

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तेलुगू सिनेमांमधील सुपरस्टार अभिनेता अल्लू अर्जुन सध्या "पुष्पा २: द रुल" या चित्रपटामुळे चर्चेत आहे. ४ डिसेंबर रोजी हैदराबाद येथील संध्या थिएटरमध्ये या चित्रपटाचा प्रिमियर शो ठेवण्यात आला होता. यासाठी अल्लू अर्जुन अचानक संध्या थिएटरमध्ये पोहोचल्यामुळे एकच गोंधळ उडाला. चाहत्यांनी त्याला जवळून पाहण्यासाठी धावाधाव केली. त्यामुळे चेंगराचेंगरीची दुर्घटना घडून त्यात ३५ वर्षीय महिला रेवतीचा मृत्यू झाला होता. तसेच तिचा मुलगाही गंभीर जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, अल्लू अर्जूनने केलेल्या कृतीमुळेच चेंगराचेंगरी झाल्याचा दावा तेलंगणा पोलिसांनी केला आहे. टाइम्स ऑफ इंडियाने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**



पोलीस प्रशासनाने सांगितलं की, सार्वजनिक कार्यक्रमांसाठी परवानगी घेण्याकरता पोलीस ठाण्यात भेट दिली जाते. परंतु, अल्लू अर्जून परवानगीकरता आले नव्हते. आम्हाला काही राजकीय व्यक्ती, चित्रपट सेलिब्रिटी, धार्मिक कार्यक्रम इत्यादींचा हवाला देऊन बंदोबस्त करण्याकरता अनेक विनंत्या येतात. परंतु, प्रत्येक कार्यक्रमासाठी बंदोबस्त प्रदान करणं आमच्या संसाधनाच्या पलीकडे आहे. या प्रकरणात आयोजकांनी फक्त आवक विभागात पत्र सादर केले होते. तरीही आम्ही योग्य व्यवस्था केली होती.पोलीस म्हणाले, अल्लू अर्जुन थिएटरमध्ये येइपर्यंत गर्दी नियंत्रणात होती. तेवढ्यात अल्लू अर्जून त्याच्या सन रुफ गाडीतून बाहेर आला आणि त्याने सर्वांना हातवारे करत प्रेक्षकांना संबोधन केलं. यामुळे मुख्य प्रवेशद्वारावर गर्दी जमली. त्याच्या गाडीला जागा करण्यासाठी त्याच्या खासगी सुरक्षा रक्षकांनी धक्काबुक्की करायला सुरुवात केली. तसंच, जवळपास दोन तासांहून अधिक काळ अल्लू अर्जुन थिएटरमध्येच होता.तसेच त्याला १४ दिवसांची कोठडी सुनावल्यानंतर अल्लू अर्जुनने अटकेपासून सुटका मिळविण्यासाठी तेलंगणा उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज मंजूर केला आहे. तर दुसरीकडे ज्या महिलेचा मृत्यू झाला, त्या महिलेचा पती भास्कर याने माध्यमांशी बोलताना सांगितले की, त्याला अल्लू अर्जुनच्या अटकेची माहिती नाही आणि तो अभिनेत्याच्या विरोधातील सर्व तक्रारी मागे घेण्यास तयार आहे. माध्यमांशी बोलताना भास्करने सांगितले, "अल्लू अर्जुनविरोधातील तक्रार मागे घेण्यास मी तयार आहे. चेंगराचेंगरीच्या प्रकरणात अल्लू अर्जुनला अटक झाल्याची मला कल्पना नाही. चेंगराचेंगरीच्या घटनशी अल्लू अर्जुनचा काहीही संबंध नाही.अल्लु अर्जुनचा जामीन मंजूर करण्यात आला असला तरीही त्याला आजची रात्र तुरुंगातच काढावी लागणार आहे. उद्या सकाळी तो तुरुंगाबाहेर येईल, असंही वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे. पोलीस प्रशासनाने सांगितलं की, सार्वजनिक कार्यक्रमांसाठी परवानगी घेण्याकरता पोलीस ठाण्यात भेट दिली जाते. परंतु, अल्लू अर्जून परवानगीकरता आले नव्हते. आम्हाला काही राजकीय व्यक्ती, चित्रपट सेलिब्रिटी, धार्मिक कार्यक्रम इत्यादींचा हवाला देऊन बंदोबस्त करण्याकरता अनेक विनंत्या येतात. परंतु, प्रत्येक कार्यक्रमासाठी बंदोबस्त प्रदान करणं आमच्या संसाधनाच्या पलीकडे आहे. या प्रकरणात आयोजकांनी फक्त आवक विभागात पत्र सादर केले होते. तरीही आम्ही योग्य व्यवस्था केली होती.पोलीस म्हणाले, अल्लू अर्जुन थिएटरमध्ये येइपर्यंत गर्दी नियंत्रणात होती. तेवढ्यात अल्लू अर्जुन त्याच्या सन रुफ गाडीतून बाहेर आला आणि त्याने सर्वांना हातवारे करत प्रेक्षकांना संबोधन केलं. यामुळे मुख्य प्रवेशद्वारावर गर्दी जमली. त्याच्या गाडीला जागा करण्यासाठी त्याच्या खासगी सुरक्षा रक्षकांनी धक्काबुक्की करायला सुरुवात केली.

### अल्लू अर्जुनची रात्र तुरुंगात

तसंच, जवळपास दोन तासांहून अधिक काळ अल्लू अर्जुन थिएटरमध्येच होता."अल्लू अर्जूनवर गुन्हा दाखल झाला असून आज त्याला अटकही करण्यात आली. तसेच त्याला १४ दिवसांची कोठडी सुनावल्यानंतर अल्लू अर्जुनने अटकेपासून सुटका मिळविण्यासाठी तेलंगणा उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज मंजूर केला आहे. तर दुसरीकडे ज्या महिलेचा मृत्यू झाला, त्या महिलेचा पती भास्कर याने माध्यमांशी बोलताना सांगितले की, त्याला अल्लू अर्जुनच्या अटकेची माहिती नाही आणि तो अभिनेत्याच्या विरोधातील सर्व तक्रारी मागे घेण्यास तयार आहे. माध्यमांशी बोलताना भास्करने सांगितले, "अल्लू अर्जुनविरोधातील तक्रार मागे घेण्यास मी तयार आहे. चेंगराचेंगरीच्या प्रकरणात अल्लू अर्जुनला अटक झाल्याची मला कल्पना नाही.

---

# राजाला वेषांतर करण्याचा शौक

## प्रियांका गांधींची संसदेतील पहिल्याच भाषणात जोरदार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केरळच्या वायनाड येथून मोठा विजय मिळवत काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी या पहिल्यांदाच संसदेत पोहचल्या आहेत. यानंतर त्यांनी आज संसदेत आपले पहिले भाषण केले. प्रियांका गांधी यांनी त्यांच्या भाषणात वेगवेगळ्या मुद्द्यांवर भाष्य केले. तसेच त्यांनी संसदेतील रखडलेल्या चर्चेच्या मुद्द्यावरून केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर सडकून टीका केली.**

प्रियांका गांधी त्यांच्या भाषणात म्हणाल्या की, "देशातील राजकीय आणि सामाजिक स्थितीवर बोलताना आपल्या भाषणात प्रियांका गांधी म्हणाल्या की, आज जनतेला खरे बोलण्यापासून घाबरवले, धमकावले जात आहे. पत्रकार, विरोधी पक्षाचा नेता असो की एखाद्या विद्यापीठाचे प्राध्यापक, विद्यार्थी-कामगार संघटनांना गप्प बसवले जात आहे. कोणावर ईडी तर कोणावर सीबीआय यांच्या माध्यमातून खोट्या केसेस दाखल करून त्यांना तुरूंगात टाकले जाते. विरोधकांना तुरूंगात टाकून त्रास दिला जात आहे. या सरकारने कोणाला सोडले नाही. यांनी



देशातील वातावरण भीतीने भरून टाकले आहे. यांची मिडियाची मशीन खोटी माहिती पसरवते आणि वेगवेगळे आरोप करते. पण कदाचित ती देखील भीतीखालीच जगत आहेत."प्रियांका गांधींनी सत्ताधाऱ्यांमध्ये चर्चा करण्याची हिंमत नसल्याचा दावा केला आहे. देशातील परिस्थिती गंभीर असल्याचे सांगत त्या म्हणाल्या की, "मी आठवण करून देऊ इच्छिते की असे वातावरण देशात इंग्रजांच्या काळात होते. जेव्हा या बाजूला बसलेले गांधींच्या विचारधारेचे लोक स्वातंत्र्याची लढाई लढत होते आणि त्या बाजूच्या विचारधारेचे लोक भीतीमध्ये राहून इंग्रजांबरोबर हातमिळवणी करत होते. पण भीतीचा देखील आपला एक स्वभाव असतो, भीती पसरवणारे देखील स्वत: भीतीचे लक्ष्य ठरतात. हा निसर्गाचा नियम आहे. हे भीती पसरवण्याची यांना इतकी सवय झाली आहे की तेच भीतीच्या सावटाखाली राहत आहेत. हे (सत्ताधारी) चर्चेला आणि टीकेला घाबरतात.

### पण राजाकडे हिम्मत नाही..

आम्ही किती दिवसांनी चर्चा करण्याची मागणी करत आहोत, पण यांच्यात चर्चा करण्याची हिंमतच नाही".सध्याच्या सत्ताधाऱ्यांकडे टीका ऐकून घेण्याची हिम्मत नसल्याचेही प्रियांका गांधी यावेळी म्हणाल्या. यासाठी त्यांनी एक उदाहरण देखील दिले. त्या म्हणाल्या की, "एक गोष्ट सांगितली जात असे की, राजा वेषांतर करून बाजारात टीका ऐकण्यासाठी जात असे. प्रजा माझ्याबद्दल काय बोलतेय? मी योग्य मार्गावर चालतोय की नाही? हे ऐकण्यासाठी राजा बाजारात जात असे. पण आजचा राजा वेषांतर तर करतो.

## आनंदाला वयाचं बंधन नाही!

जुनी गाणी म्हटलं आजही प्रेक्षकांच्या लक्षात राहणारी आणि तितकीच लोकप्रिय. आजही जुनी गाणी रसिकांच्या ओठावर असतात. त्यातच 70 च्या दशकातील गाण्यामध्ये एक वेगळेपणा होता. एक गोडवा होता. त्यामुळे आजही त्या काळातील गाणी लोकांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. असचं त्या काळातील एक प्रसिद्ध गाणं म्हणजे 'कोई शहरी बाबू दिल लहरी बाबू'. आजही हे गाणं अनेकांना तोंड पाठ असेल. बॉलिवूडमधील ज्येष्ठ अभिनेक्षी मुमताज आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या डान्सचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये मुमताज आणि आशा भोसले या दोघी "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" (गाण्यावर थिरकताना दिसत आहेत. दोघींच्या या व्हिडीओ नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. मुमताज यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये त्या आशा भोसले यांच्यासोबत "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" या गाण्यावर डान्स करताना दिसत आहेत. व्हिडीओमध्ये मुमताज या आशा भोसले यांना डान्स स्टेप्स सांगताना दिसत आहेत. मुमताज यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये त्या बॅक आऊटफिटमध्ये दिसत आहेत. "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" हे गाणे लोफर या चित्रपटामधील आहे. हे गाणे लक्ष्मीकांत- प्यारेलाल या जोडीने लिहिले आहे आणि आशा भोसले यांनी हे गायले आहे. आजही लोक हे गाण आवडीनं ऐकतात. भीमसिंह दिग्दर्शित लोफर हा चित्रपट 1973 मध्ये रिलीज झाला होता. धर्मेंद्र आणि मुमताज या चित्रपटात मुख्य भूमिकेत होते तर ओम प्रकाश, प्रेमनाथ आणि के एन सिंग यांनी देखील या चित्रपटात काम केलं होतं. "कोई सहरी

## राणी मुखर्जी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला

बॉलीवूड अभिनेत्री राणी मुखर्जी पुन्हा एकदा वरिष्ठ निरीक्षक शिवानी शिवाजी रॉय या भूमिकेत झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. शुक्रवारी 'मर्दानी ३' चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटात प्रेक्षकांना पुन्हा एकदा राणी मुखर्जीचा भारदस्त अभिनय पाहता येणार आहे.'मर्दानी २' रिलीजच्या वर्धापन दिनानिमित्त यश राज फिल्म्सने 'मर्दानी ३'ची घोषणा करत एक पोस्टर शेअर केलं आहे. तसेच कॅप्शनमध्ये लिहिलं, "प्रतीक्षा संपली! 'मर्दानी ३'मध्ये राणी मुखर्जी पुन्हा एकदा शिवानी शिवाजी रॉय या भूमिकेत दिसणार आहे. २०२६ मध्ये चित्रपटगृहांत." राणी मुखर्जीच्या 'मर्दानी ३' चित्रपटाची चाहते गेल्या अनेक दिवसांपासून वाट पाहत आहेत. हा चित्रपट २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याची नेमकी तारीख अद्याप समोर आलेली नाही.'मर्दानी ३' चित्रपटाचे दिग्दर्शन अभिराज मीनावाला करणार आहे, तर निर्मिती आदित्य चोपडा करणार आहे. अभिनेत्री राणी मुखर्जीने यावर तिची प्रतिक्रिया दिली आहे. तिने म्हटलं, "मला ही घोषणा करताना फार आनंद होत आहे की, आम्ही २०२५ मध्ये 'मर्दानी ३' चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात करत आहोत. पोलिसांच्या वर्दीत अशा भूमिका साकारणे प्रत्येक कलाकारासाठी एक अभिमानाची गोष्ट असते, मझ्यासाठीदेखील ही फार मोठी गर्वाची गोष्ट आहे. आजवर मोठ्या हिमतीने सर्वांचे रक्षण करताना बलिदान दिलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांसाठी ही एक श्रद्धांजली आहे." "मागच्या दोन चित्रपटांच्या तुलनेत 'मर्दानी ३' फार खास असणार आहे.

## जान्हवी शिखरला करतीये डेट?



बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री जान्हवी कपूर ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. नुकतीच जान्हवी ही महाकाल देवाच्या दर्शनासाठी उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरात गेली होती. महाकालेश्वर मंदिरातील जान्हवीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामध्ये ते भजन म्हणताना दिसत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या महाकालेश्वर मंदिरातील व्हिडीओमध्ये दिसत आहे की, जान्हवी कपूर ही सुशील कुमार शिंदे यांचा नातू शिखर पहाडियासोबत महाकाल देवाच्या भक्तीत तल्लीन झालेली दिसत आहे. जान्हवी आणि शिखर यांच्यासोबतच दिग्दर्शक ॲटलीनं देखील महाकाल देवाचे दर्शन घेतले आहे. काही दिवसांपूर्वी जान्हवी आणि शिखरने तिरुपती बालाजीचे दर्शनही घेतले होते. शिखर पहाडिया हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांचा नातू आहे. शिखर हा स्मृती शिंदे आणि संजय पहाडिया यांचा मुलगा आहे. जान्हवीचं नाव गेल्या काही दिवसांपासून शिखरसोबत जोडलं जात आहे. शिखर आणि जान्हवी यांनी त्यांच्या चाहत्यांना त्यांच्या नात्याबाबत अजून कोणतीही माहिती दिलेली नाही. पण विविध कार्यक्रमांमध्ये शिखर आणि जान्हवी यांना एकत्र स्पॉट केलं जातं. त्यामुळे जान्हवी आणि शिखर यांच्या नात्याबाबत सोशल मीडियावर चर्चा होत असते. गुंजन सक्सेना, घोस्ट स्टोरीज, दोस्ताना 2, रूही यांसारख्या हिट चित्रपटांमध्ये जान्हवीनं काम केलं आहे. मिली या चित्रपटातील अभिनयाचं अनेकांनी कौतुक केलं. जान्हवीच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत असतात. ती लवकरच ज्युनियर एनटीआरसोबत 'देवारा' या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटातून जान्हवी ही साऊथमध्ये पदार्पण करत आहे.

## मराठमोळी राधिका आपटे झाली आई

मराठमोळी बॉलीवूड अभिनेत्री राधिका आपटे आई झाली आहे. राधिकाने तिच्या बाळाबरोबरचा फोटो शेअर करून चाहत्यांशी ही आनंदाची बातमी शेअर केली आहे. राधिकाने तिच्या बाळाची पहिली झलक दाखवली आहे. राधिकाचं बाळ एका आठवड्याचं झालं आहे. राधिका आपटे लग्नानंतर १२ वर्षांनी आई झाली आहे. दोन महिन्यापूर्वी तिने बेबी बंप फ्लॉट करून तिच्या घरी नवीन सदस्याचं आगमन होणार असल्याची गुड न्यूज दिली होती. आता तिने बाळाबरोबरचा फोटो शेअर करत प्रसूतीनंतर ती कामावर परतली आहे, अशी माहिती दिली. राधिकाने तिला मुलगा झाला की मुलगी याबाबत सांगितलेलं नाही.राधिकाने शेअर केलेल्या फोटोमध्ये ती लॅपटॉपसमोर बसलेली दिसत आहे. तर तिच्या कुशीत बाळ आहे. तिने दिलेल्या कॅप्शनुसार तिचं बाळ एका आठवड्याचं झालं आहे. एका आठवड्याच्या बाळाच्या जन्मानंतर पहिली वर्क मीटिंग अशा आशयाचं कॅप्शन देत राधिकाने फोटो पोस्ट केला आहे. राधिका तिचं वैयक्तिक आयुष्य सोशल मीडियापासून दूर ठेवते. राधिकाने तिच्या लग्नाची माहितीही बराच काळ लपवून ठेवली होती. तिने वर्षभर डेट केल्यावर २०१२ मध्ये ब्रिटीश व्हायोलिन वादक आणि लोकप्रिय संगीतकार बेनेडिक्ट टेलरशी लग्नगाठ बांधली होती. आता राधिका व बेनेडिक्ट दोघेही एका गोंडस बाळाचे आई-बाबा झाले आहेत.मराठमोळी बॉलीवूड अभिनेत्री राधिका आपटे आई झाली आहे. राधिकाने तिच्या बाळाबरोबरचा फोटो शेअर करून चाहत्यांशी ही आनंदाची बातमी शेअर केली आहे. राधिकाने तिच्या बाळाची पहिली झलक दाखवली आहे. राधिकाचं बाळ एका आठवड्याचं झालं आहे. राधिका आपटे लग्नानंतर १२ वर्षांनी आई झाली आहे. दोन महिन्यापूर्वी तिने बेबी बंप फ्लॉट करून तिच्या घरी नवीन सदस्याचं आगमन होणार असल्याची गुड न्यूज दिली होती. आता तिने बाळाबरोबरचा फोटो शेअर करत प्रसूतीनंतर ती कामावर परतली आहे, अशी माहिती दिली.



## निया शर्माच्या समोर तर उर्फी पण फेल




उर्फी जावेद ही तिच्या अतरंगी फॅशनमुळे नेहमी चर्चेत असते. उर्फीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. अशातच आता आणखी एका अभिनेत्रीच्या हटके आऊटफिटची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. या अभिनेत्रीचे हटके लूकमधील फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. जाणून घेऊयात या अभिनेत्रीबद्दल... अभिनेत्री निया शर्मानं खास लूकमध्ये एका बर्थडे पार्टीला हजेरी लावली. नियाच्या या लूकची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. नियाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामध्ये ती ब्लॅक आऊटफिट, हातात ब्लॅक बॅग आणि मोकळे केस अशा लूकमध्ये दिसत आहे. तिच्या या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. निया शर्माच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "हिच्या समोर तर उर्फी पण फेल" तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असाच ट्रेलर उर्फीनं घातला होता, तेव्हा तिला अनेकांनी ट्रोल केलं होतं." निया शर्मा अनेक मालिकांमध्ये काम केलं आहे. निया शर्मानं 'काली- एक अग्निपरीक्षा' या 2010 मधील मालिकेमधून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. 'जमाई राजा' या मालिकेमुळे तिला विशेष लोकप्रियता मिळाली.'खतरों के खिलाडी' आणि 'झलक दिखला जा' या कार्यक्रमांमध्ये देखील तिनं सहभाग घेतला होता. निया ही सोशल मीडियावर विविध लूकमधील फोटो शेअर करत असते. तिच्या सोशल मीडियावरील फोटो आणि व्हिडीओवर नेटकरी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत असतात.

# माझा मुलगा डावखुरा फलंदाज

## विनोद कांबळीने आजारपण, कौटुंबिक आणि सध्याची आर्थिक परिस्थितीबाबत केले भाष्य

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिवंगत क्रिकेट प्रशिक्षक रमाकांत आचरेकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी पार्क येथे आचरेकर यांच्या स्मारकाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांचे एकेकाळचे शिष्य असलेले सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळी उपस्थित होते. यावेळी मंचावर बसलेल्या विनोद कांबळी आणि सचिन तेंडुलकर यांच्या भेटीचा एक व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला. ज्यामध्ये विनोद कांबळीला उठता येत नव्हते, व्यवस्थित बोलता येत नव्हते, असे दिसले. या व्हिडीओनंतर विनोद कांबळीबाबत पुन्हा एकदा उलटसुलट चर्चा सुरू झाल्या. मात्र आता विकी ललवानी यांना दिलेल्या एका मुलाखतीत विनोद कांबळीने आपले आजारपण, कौटुंबिक आणि सध्याची आर्थिक परिस्थिती याबाबत भाष्य केले आहे. तसेच आपला मुलगाही क्रिकेट खेळत असल्याची माहिती दिली.**



या मुलाखतीमध्ये कुटुंबाबाबत बोलत असताना विनोद कांबळी म्हणाले, मला १४ वर्षांचा एक मुलगा आणि १० वर्षांची एक मुलगी आहे. मुलगा जिजस क्रिस्टियानो कांबळीही क्रिकेट खेळतो. तोही माझ्यासारखाच डावखुरा फलंदाज असून बिनधास्त फटकेबाजी करतो. पहिल्या चेंडूपासून तो फटकेबाजी करत असून तो माझ्यासारखाच खेळतो. तोही कधीतरी भारतीय संघात येईल, असे मला वाटते.विनोद कांबळी हृदयविकाराचा झटका आला त्या घटनेबद्दल सांगताना म्हणाले, “मला अचानक अस्वस्थ वाटायला लागले होते. मी कार चालवता चालवताना पडलो आणि माझ्या पत्नीने मला थेट लिलावतीमध्ये दाखल केले आणि तेव्हा दोन हृदयविकाराचे झटके आले होते. एकावेळी दोन हृदयविकाराचे झटके कोणाला येतात. माझी पत्नी तेव्हा माझ्याबरोबर होती, ते सर्व पाहून रडत होती.”विनोद कांबळी यांनी आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीबाबतही भाष्य केले. ते म्हणाले, “माझी आर्थिक परिस्थिती सध्या हलाखीची आहे. पण माझे कुटुंब खंबीरपणे माझ्या पाठिशी उभे आहे. माझी पत्नी अँड्रियाने सर्व व्यवस्थित हाताळले असून मी तिला सलाम करतो.” तसेच सुनील गावस्कर, कपिल देव यांनी मला मदतीचे आवाहन केले आहे. कपिल देव यांनी मला पुनर्वसन केंद्रात जाण्याचे आवाहन केले आहे, तेही मी स्वीकारले असल्याचे ते म्हणाले. विनोद कांबळी यांनी दोनवेळा द्विशतक झळकावले होते. यातील कोणती खेळी स्मरणार राहिली? असा प्रश्न विचारल्यानंतर ते म्हणाले, वानखेडेवर झालेल्या सामन्यात झळकावलेले द्विशतक कायम लक्षात राहिले. त्या सामन्यात आचरेकर सरही मैदानावर उपस्थित होते. त्यावेळी संघात सर्व उत्कृष्ट खेळाडू होते. तो सामना माझ्या कायम लक्षात राहिर, असे विनोद कांबळी म्हणाले.दिवंगत क्रिकेट प्रशिक्षक रमाकांत आचरेकर यांच्या जयंतीनिमित्त दादरच्या शिवाजी पार्क येथे आचरेकर यांच्या स्मारकाचं उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांचे एकेकाळचे शिष्य असलेले सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळी एकत्र एका मंचावर उपस्थित होते. यावेळी विनोद कांबळी यांनी गुरू आचरेकर यांच्यासाठी एक गाणंही गायलं. बोबडे बोल आणि उठताही येत नसलेल्या विनोद कांबळी यांचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर त्यांच्याबद्दल उलटसुलट चर्चा सुरू होत्या. यानंतर आता विनोद कांबळी यांनी एका युट्यूब चॅनेलला आपल्या स्वभावाप्रमाणे बेधडक मुलाखत दिली असून आजारपण, डळमळलेली आर्थिक परिस्थिती, कुटुंबाची साथ, सचिन तेंडुलकरची मैत्री याबाबत स्पष्टपणे भूमिका मांडली आहे.

### पत्नी अँड्रियाशी लग्न कसे झाले?

विकी ललवानी यांच्या युट्यूब चॅनेलला विनोद कांबळी यांनी नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी कुटुंबाबत भाष्य केले. यावेळी त्यांना चित्रपटांबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, मी दिलीप कुमार यांचा चाहता आहे. त्यांना मी भेटलेलोही होतो. त्यांचे सर्व चित्रपट पाहिले आहेत. कोणती अभिनेत्री आवडते? या प्रश्नावर विनोद कांबळी लाजले आणि त्यांनी पत्नी अँड्रियाचा अभिनय आवडतो असे सांगितले.आपल्या लग्नाबाबत सांगताना विनोद कांबळी यांनी गमतीशीर किस्सा सांगितला. ते म्हणाले, वांद्र्यातून जात असताना मी पहिल्यांदा तिला पोस्टरवर पाहिले होते. ती फॅशन मॉडेल होती. पोस्टरवर तिला पाहून मी तिथल्या तिथे मित्राला म्हणालो की, मी हिच्याशी लग्न करणार. ख्रिसमसच्या वेळेला मी अँड्रियाला पहिल्यांदा भेटलो. त्यानंतर आम्ही बरेच दिवस भेटत होतो. तेव्हा कुठे जाऊन आमचे लग्न झाले.

---


# करोडपती झाला विश्वविजेता गुकेश

## बुद्धिबळ स्पर्धा जिंकल्यानंतर किती मिळाली बक्षिसाची रक्कम?

।नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा ग्रँडमास्टर डी गुकेशने ऐतिहासिक कामगिरी करत जागतिक बुद्धिबळ स्पर्धा जिंकणारा सर्वात युवा खेळाडू ठरला आहे. गुरुवारी १४व्या आणि अंतिम सामन्यात गतविजेत्या चीनच्या डिंग लिरेनला पराभूत करून वयाच्या १८व्या वर्षी सर्वात तरुण जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन बनला.**




या वर्षाच्या सुरुवातीला कँडिडेट्स टूर्नामेंट जिंकल्यानंतर गुकेश हा जागतिक विजेतेपदासाठी आव्हान देणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला. गुकेशला वर्ल्ड चॅम्पियन ठरल्यानंतर किती बक्षिसाची रक्कम मिळाली, जाणून घ्या.जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिप ही क्रीडा जगतात सर्वाधिक बक्षीस रक्कम असलेल्या चॅम्पियनशिपपैकी एक आहे. या चॅम्पियनशिपची बक्षीस रक्कम २.५ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच अंदाजे २१ कोटी रुपये आहे.बुद्धिबळची आंतरराष्ट्रीय संघटना FIDE च्या नियमांनुसार, अंतिम सामना खेळणाऱ्या खेळाडूंना प्रत्येक सामना जिंकण्यासाठी २० हजार डॉलर्स म्हणजेच अंदाजे १.६९ कोटी रुपये मिळतात. तर उर्वरित रक्कम दोन्ही खेळाडूंमध्ये समान प्रमाणात विभागली जाते. डी गुकेशने चॅम्पियनशिपमध्ये तीन सामने जिंकले होते. त्याने तिसरा, ११वा आणि शेवटचा सामना जिंकला. यासाठी त्याला ६० हजार डॉलर म्हणजेच ५.०७ कोटी रुपये मिळाले. उरलेली रक्कम दोघांमध्ये समान प्रमाणात विभागली गेली. म्हणजेच गुकेशला एकूण १.३५ मिलियन डॉलर्स म्हणजेच ११.४५ कोटी रुपये तर लिरेनला १.१५ मिलियन डॉलर्स म्हणजेच ९.७५ कोटी रुपये मिळाले आहेत.

### वयाच्या 18व्या वर्षी विश्वविजेता

डी गुकेश हा विश्वनाथन आनंद यांच्यानंतर बुद्धिबळ विश्वविजेता ठरलेला दुसरा भारतीय खेळाडू आहे. १४व्या डावात गुकेशचे गण ७.५ तर लिरेनचे ६.५ होते. अखेरच्या क्षणी डिंग लिरेनने मोठी घोडचूक केली, गुकेशला त्याची चूक कळताच त्याच्या चेहऱ्यावर मोठं हसू उमटलं आणि तो खुर्चीवरून उठून मागे गेला. थोड्यावेळाने त्याने हात मिळवत माघार घेतली आणि डी गुकेश सर्वात तरूण विश्वविजेता बुद्धिबळपटू ठरला.या चॅम्पियनशिपची बक्षीस रक्कम २.५ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच अंदाजे २१ कोटी रुपये आहे.